15 APR 2026 पुण्यनगरी
जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



ज्ञान-विज्ञान

# गॅलिलिओचे प्रयोग!

डॉ. व्ही.एन. शिंदे

**गॅलिलिओ यांनी दुर्बिणीमध्ये सुधारणा करून ती बत्तीस पट अधिक कार्यक्षम बनवली. यातून आकशाचे निरीक्षण केले आणि आपले निष्कर्ष मांडले. सूर्य, सूर्यमालेच्या केंद्रस्थानी आहे. सर्व ग्रह सूर्याभोवती फिरतात, पृथ्वीही सूर्याभोवती फिरते, असे मत मांडण्यास सुरुवात केली.**

ज्ञान निर्मितीच्या प्रक्रियेत अनुभव अत्यंत महत्त्वाचा असतो. अनुभवाचे विश्लेषण करण्याची क्षमता ज्याच्याकडे असते, तो ज्ञानापर्यंत पोहोचू शकतो. तथागत गौतम बुद्ध आपल्या शिष्यांना, अनुयायांना सांगत, 'कोणतीही गोष्ट केवळ मी सांगतो म्हणून स्वीकारू नका. ती तुमच्या अनुभवाला, बुद्धीने तपासून, मी सांगितलेले पटले तरंच मान्य करा.' मात्र जगभर, 'बाबा वाक्यं प्रमाणम्' अशी संस्कृती रूजलेली. आपले महत्त्व वाढवण्यासाठी 'मी म्हणतो तेचं खरे' हे आजही मोठ्या प्रमाणात शिष्यांवर, अनुयायांवर बिंबवण्याचा प्रयत्न होतो. आज आपण पृथ्वी गोल आहे हे शालेय जीवनातच शिकतो, मात्र हे सत्य आपल्यापर्यंत पोहोचवण्याची मोठी किंमत एका संशोधकाला मोजावी लागली. ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात रूजवण्याचा प्रयत्न करणारे पहिले संशोधक म्हणजे गॅलिलिओ गॅलिली.

गॅलिलिओंच्या जन्मापूर्वी अठराशेपेक्षा जास्त वर्षांपूर्वी जन्मलेल्या अरिस्टॉटल यांनी आपल्या चिंतनातून अनेक भाष्ये केली होती. ती मांडणी धर्मग्रंथांना पुरक होती. त्यामध्ये अनुभवांना कसलेच स्थान नव्हते. अनेक मतांना वैज्ञानिक अधिष्ठान नव्हते, मात्र थोरा-मोठ्यांचा शब्द प्रमाण झाला. तेच शाळा-महाविद्यालयातून शिकवले जात होते. कोपर्निकस, गिल्बर्ट अशा अनेक विचारवंताना अरिस्टॉटल, प्लेटो, टोलेमींची मते चुकीची आहेत हे लक्षात आले. त्यांनी ग्रंथातून मांडणीही केली, मात्र सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष प्रयत्न केले नव्हते. गिल्बर्टसारख्या संशोधकांनी अत्यंत संयत भाषेत निष्कर्ष मांडले, तर कोपर्निकस यांनी ग्रंथ पोप पॉल तृतीय यांना अर्पण करून, आपल्यावर रोष येणार नाही याची दक्षता घेतली. गॅलिलिओ यांनी मात्र होणाऱ्या परिणामांची भिती न बाळगता आपले म्हणणे मांडले. एवढेच नाही तर आपले म्हणण्याची स्वतःच्या डोळ्यांनी खातरजमा करावी, अनुभव घ्यावा असा आग्रह धरला. विविध ठिकाणी लोकांसमवेत प्रयोग केले.

गॅलिलिओ यांचा जन्म १५ फेब्रुवारी १५६४ रोजी इटलीतील पिसा शहरात झाला. त्यांचे वडील विन्सेन्झो गॅलिली, बंडखोर संगितकार होते. त्यांच्याकडूनच बंडखोरपणा गॅलिलिओ यांच्यात उतरला असावा. गॅलिलिओ यांनी सुरुवातीचे शिक्षण धार्मिक मठामध्ये घेतले. वडिलांना आपल्या मुलाने डॉक्टर व्हावे असे वाटत होते, मात्र या शाळेत गॅलिलिओ पूर्णतः विरक्त जीवन जगू लागले, त्यामुळे वडिलांनी त्यांना दुसऱ्या शाळेत घातले. पुढे त्यांना पिसा विद्यापीठामध्ये वैद्यक अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला, मात्र त्यांचे या अभ्यासात लक्ष लागत नव्हते. अखेर त्यांनी वडिलांच्या इच्छेविरुद्ध गणिताच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला. दरम्यान, आर्थिक परिस्थिती बिघडल्याने त्यांनी पदवी न घेताच शिक्षण सोडून दिले. अर्थार्जनासाठी शिकवण्या घेण्यास सुरुवात केली. विद्यार्थी असताना त्यांनी अरिस्टॉटलच्या विचारांचा अभ्यास केला होता. आता शिकवण्यासाठी पुन्हा अभ्यास करताना हे विचार योग्य नाहीत, असे त्यांना वाटत असे. अभ्यासक्रमानुसार शिकवावे लागत असले तरी आपण मुलांना चुकीचे शिकवतो असे त्यांचे मत होते. अरिस्टॉटलची मते प्रयोगाच्या सहाय्याने पडताळून पाहणे आवश्यक वाटू लागले.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

दुसरीकडे त्यांचे उपकरणे बनवण्यासाठी प्रयोग सुरू होते. यातून त्यांनी एक तराजू तयार केला, यावर 'छोटा तराजू' नावाची पुस्तिका तयार केली. त्यानंतर 'फ्लोरेन्टाईन क्लब'ने 'जगाची रचना' या विषयावर व्याख्यान देण्यास बोलावले. या व्याख्यानाने त्यांना मोठी प्रसिद्धी दिली. त्यांनी गणिताबाबतचे आपले निष्कर्षही एका पुस्तकाद्वारे प्रकाशित केले. यातून त्यांना पिसा विद्यापीठामध्ये नोकरी मिळाली. आर्थिक विवंचना मिटल्याने आता प्रयोगासाठी, चिंतनासाठी अधिक वेळ मिळू लागला. त्यांना अरिस्टॉटलची मते प्रयोगाद्वारे पडताळून पहायची होती. पडताळणी करण्यास सोपा विषय निवडला. अरिस्टॉटल यांच्या मते, 'एक जड आणि एक हलकी वस्तू एकाचवेळी एकाच ठिकाणावरून सोडल्यास जड वस्तू लवकर जमिनीवर पोहोचते. या मताची पडताळणी करण्यासाठी ते पिसाच्या मनोऱ्यावर गेले. तेथून त्यांनी एकाच आकाराचे वेगवेगळ्या वजनाचे दोन चेंडू मनोऱ्यावरून खाली टाकले आणि दोन्ही चेंडू एकाचवेळी जमिनीवर पोहोचले. अरिस्टॉटलचे मत खोटं ठरले. यानंतर त्यांनी आपल्या निरीक्षणावर आधारित 'डी मोटू' नावाचा ग्रंथ लिहिला. यानंतर समाजातील एक मोठा वर्ग, 'गॅलिलिओ स्वतःला अरिस्टॉटलपेक्षा मोठे मानतात' असे सांगू लागला. त्यांचे म्हणणे खरे की खोटे हे त्यांनी तपासले नाही. या वादामुळे पिसा विद्यापीठाने त्यांच्या नोकरीचे कंत्राट पुढे वाढवण्यास नकार दिला.

पुन्हा गॅलिलिओ आर्थिक संकटात सापडले. आर्थिक समस्या सोडवण्यासाठी त्यांनी कंपास आणि भौमितीक साहित्य बनवून विकण्यास सुरुवात केली. त्यातून पैसे मिळू लागल्यानंतर त्यांनी पुन्हा संशोधन सुरू केले. दरम्यान, हॉलंडच्या संशोधकांनी दुर्बिण तयार केल्याचे आणि ती दूरवरचे, विशेषतः शत्रूच्या हालचाली पाहण्यासाठी वापरत असल्याचे त्यांना समजले. त्यांनी एक दुर्बिण मिळवून सुधारणा केल्या. या दुर्बिणीच्या सहाय्याने अंतराळाचे निरीक्षण करण्यास सुरुवात केली. त्याचवेळी त्यांचे गतीविषयक संशोधनही सुरू होते. याच काळात केपलरही याच विषयावर संशोधन करत होते. गॅलिलिओ यांनी केपलर यांना गुप्त पत्र पाठवून त्यांच्या निष्कर्षांशी आपली समीकरणे जुळत असल्याचे कळवले.

गॅलिलिओ यांनी दुर्बिणीमध्ये सुधारणा करून ती बत्तीस पट अधिक कार्यक्षम बनवली. यातून आकाशाचे निरीक्षण केले आणि आपले निष्कर्ष मांडले. सूर्य, सूर्यमालेच्या केंद्रस्थानी आहे. सर्व ग्रह सूर्याभोवती फिरतात, पृथ्वीही सूर्याभोवती फिरते असे मत मांडण्यास सुरुवात केली. त्यांनी अरिस्टॉटलचे नाही, तर कोपर्निकसचे म्हणणे खरे असल्याचे प्रयोगातून, निरीक्षणातून सिद्ध केले. त्यांनी चंद्राला स्वतःचा प्रकाश नाही. तोही पृथ्वीसारखाच मातीचा, खडकाचा बनलेला आहे हे ही सांगितले. गुरू ग्रहाला चार उपग्रह असल्याचेही त्यांनी शोधून काढले. दरम्यान, त्यांच्या हितशत्रूंनी त्यांच्याविरुद्ध तक्रारी करण्यास सुरुवात केली. 'गॅलिलिओ हे अरिस्टॉटल आणि टोलेमी यांना विरोध करतात आणि कोपर्निकसच्या मतांची पाठराखण करतात' हा त्यांचा मुख्य आरोप होता. यावर गॅलिलिओना तसे न करण्याचे आदेश देण्यात आले, तरीही गॅलिलिओ बधले नाहीत. पुढे त्यांनी अरिस्टॉटल, कोपर्निकस आणि गॅलिलिओ यांच्यातील संवादरूपात लिहिलेल्या ग्रंथातून धर्मग्रंथातील मांडणीला थेट आव्हान देणारे लेखन केले, त्यामुळे धर्मपीठे अस्वस्थ झाली, त्यामुळे त्यांच्यावर धर्मपिठासमोर खटला भरण्यात आला. पोप त्यांचे मित्र होते. गॅलिलिओंचे म्हणणे सत्य आहे हे त्यांना पटत होते, तरीही गॅलिलिओ यांना या धर्मपीठाने देहदंडाची शिक्षा सुनावली. पुढे पोप यांच्या सूचनेनुसार गॅलिलिओंनी माफी मागितली, मात्र तो त्यांनी केलेला तह होता. माफीमुळे शिक्षा नजरकैदेत बदलली. नजरकैदेत असताना त्यांनी एक ग्रंथ लिहिला. तो सार्टी या विद्यार्थ्यासोबत इटलीबाहेर पाठवला आणि त्यातून सत्य जगासमोर मांडले. त्यांना सत्य सांगण्याच्या आग्रहामुळे प्रचंड त्रास सोसावा लागला, तरी या सत्याच्या आग्रहामुळेच ते अजरामर झाले.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

15 APR 2026

लोकमत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महामानवांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांची भव्य शोभायात्रा

## आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यापीठात विविध कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती शिवाजी विद्यापीठ येथे शोभायात्रा, व्याख्यान व विविध कार्यक्रमांनी उत्सांहात साजरी करण्यात आली. यावेळी आंबेडकरांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांनी महामानवांच्या वेशभूषेत भव्य शोभायात्रा काढून लेझीम, ढोल-ताशांच्या गजरात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण केले.

विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मंगळवारी सकाळी विद्यापीठाच्या प्रांगणातून भव्य शोभायात्रा काढली. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता जिजाऊ साहेब, सावित्रीबाई फुले, माता रमाई, अण्णा भाऊ साठे, लहुजी साळवे, आदी महामानवांच्या वेशभूषेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी अग्रस्थानी होते. सजवलेल्या घोडाबग्गीमध्ये डॉ. आंबेडकर यांचे भव्य छायाचित्र ठेवलेले होते. लेझीम, हलगी आणि ढोल, झांजपथकाच्या निनादात आणि स्फूर्तीगीते गात विद्यार्थ्यांनी महामानवाला आगळे अभिवादन केले.



शिवाजी विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेत महामानवांच्या वेशभूषेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भाग घेतला. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासमवेत अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, यावेळी गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. प्रशांत बनसोडे यांनी आंबेडकरांचे विचार जागतिक पातळीवर प्रभावी असून, आंतरराष्ट्रीय बौद्धिक चर्चेच्या केंद्रस्थानी असल्याचे सांगितले. त्यांच्या विचारांची मांडणी 'डेमोक्रॅटिक सोशलिझम'च्या चौकटीत समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. महादेव देशमुख यांनी प्रास्ताविक केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले. तत्पूर्वी, विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. दरम्यान, रिल्स मेकिंग स्पर्धेत प्रतिभा जाधव यांनी प्रथम, केदार माने यांनी द्वितीय, प्रेरणा खटावकर यांनी तृतीय तर, प्रकाश आवारे आणि कोमल गरड यांनी उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले.

15 APR 2026
पुढारी

# पूर नियंत्रणासाठी स्वप्नालीने बनवले स्मार्ट फ्लड गार्ड

● जागतिक परिषदेत करणार भारताचे प्रतिनिधित्व

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागातील जिओ इन्फॉर्मेटिक्स एम.एस्सी.च्या प्रथम वर्षाची विद्यार्थिनी स्वप्नाली मगदूम हिने पूर नियंत्रण क्षेत्रात नावीन्यपूर्ण संशोधन सादर करत राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवले आहे. अमेरिकन जीआयएस क्षेत्रातील अग्रगण्य संस्था 'एसरी' या भारतीय शाखेतर्फे आयोजित 'यंग स्कॉलर' स्पर्धेत तिने संपूर्ण भारतातून प्रथम क्रमांक पटकावला आहे.



स्वप्नालीने सादर केलेल्या 'स्मार्ट फ्लड गार्ड : मोबाईल आणि आयओटी आधारित रिअल टाईम : अचानक पूर निरीक्षण, पूर्वसूचना व सुरक्षित स्थलांतर प्रणाली' या प्रकल्पामुळे पूर परिस्थितीचे अचूक आणि तत्काळ आकलन होण्यास मदत होणार आहे. अचानक येणाऱ्या महापुराचा धोका ओळखून नागरिकांना वेळेवर सतर्क करणे, सुरक्षित स्थलांतराचे मार्ग सुचवणे आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना तत्काळ माहिती उपलब्ध करून देणे अशी बहुपयोगी वैशिष्ट्ये या प्रणालीत आहेत. मोबाईल ॲप आणि आयओटी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विकसित केलेली ही यंत्रणा नदीपात्रातील पाणी पातळी, पर्जन्यमान आणि भौगोलिक माहितीचे रिअल टाईम विश्लेषण करते. त्यामुळे पूरस्थितीचा अंदाज अधिक अचूकपणे बांधता येतो. विशेषतः पूरप्रवण ग्रामीण भागासाठी ही प्रणाली अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या संशोधनामुळे स्वप्नालीची निवड जुलै २०२६ मधील जागतिक स्तरावरील ७० 'यंग स्कॉलर्स'मध्ये झाली असून, ती कॅलिफोर्नियातील सॅन डिएगो येथे होणाऱ्या परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.

15 APR 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शैक्षणिक

## डॉ. अजित कोळेकर; डी. वाय. पाटील इंजिनियरिंगमध्ये इन्व्हेंटो-२०२६ उत्साहात

# तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर आवश्यक

**सामाजिक व औद्योगिक समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्यासाठी तंत्रज्ञानाचा योग्य आणि परिणामकारक वापर करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी विभागाचे प्राचार्य डॉ. अजित कोळेकर यांनी केले. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, साळोखेनगर येथे आयोजित इन्व्हेंटो-२०२६ या तांत्रिक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.**

**। त. भा. वार्ताहर**




**कळंबा : इन्व्हेंटो-२०२६ महोत्सवात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. अजित कोळेकर. यावेळी डॉ. अभिजीत माने, डॉ. सुरेश माने, प्रा. गौरव देसाई, डॉ. शिवानी काळे व प्रा. प्रीतम देसाई उपस्थित होते.**

**कळंबा :** अभियांत्रिकी विद्यार्थ्यांमधील नाविन्यपूर्ण कल्पनांना वाव मिळावा आणि त्यांची तांत्रिक कौशल्ये अधिक विकसित व्हावीत या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन (आयएसटीई) आणि इन्स्टिट्यूट इनोव्हेशन कौन्सिल (आय आय सी) यांच्या सहकार्याने हा उपक्रम पार पडला. डॉ. अजित कोळेकर यांनी विद्यार्थ्यांना उद्योगविश्वात आवश्यक असलेल्या आधुनिक कौशल्यांचा अभ्यास करून स्वतःसाठी नव्या संधी निर्माण करण्याचे तसेच, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समाजातील समस्यांवर उपाय शोधण्याची जबाबदारीही युवकांनी स्वीकारावी, असे आवाहन केले.

कॅम्पस संचालक डॉ. अभिजीत माने यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला आणि सर्जनशीलतेला चालना मिळते, असे सांगितले.

## विविध स्पर्धांचे आयोजन

**इन्व्हेंटो-२०२६ महोत्सवात रोबोरेस, इलेक्ट्रोहन्ट, टेक उत्सव, बिल्टप मास्टर, सर्वे लीग, आयडियाथॉन, गर्ल्स ॲक्शन मेनिया, जीडी लीग, प्रेम द फेम, एआयथॉन, पिक्सेल क्राफ्ट, कोडस्लेअर आणि पोस्टर प्रेझेंटेशन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये कोल्हापूरसह सांगली, सातारा, सोलापूर आणि पुणे येथील विविध अभियांत्रिकी व पॉलिटेक्निक महाविद्यालयांतील ९०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धांतील विजेत्यांना रोख पारितोषिके, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.**

प्राचार्य डॉ. सुरेश माने यांनी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांसह स्टार्टअप उपक्रमांची माहिती दिली.

या कार्यक्रमाचे संयोजन डीन स्टुडंट वेल्फेअर गौरव देसाई यांनी केले. विद्यार्थी समन्वयक महमदअब्सर मणेरी, मिलिंद शिंदे, कौस्तुभ पाटील, जानकी पटेल, प्रियांका मांडवकर तसेच प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त तेजस पाटील, चीफ ऑपरेशन एक्झिक्यूटिव्ह देवश्री पाटील, कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता, कॅम्पस संचालक डॉ. अभिजीत माने, प्राचार्य डॉ. सुरेश माने आणि प्रशासकीय अधिकारी सुयोग पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

15 APR 2026
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ...म्हणूनच डॉ. बाबासाहेबांकडून धम्मस्वीकार

■ प्रा. सुकुमार कांबळे : शिवाजी विद्यापीठात शाहू-फुले-आंबेडकर सप्ताहाला प्रारंभ

| प्रतिनिधी,कोल्हापूर

माणसाला माणूस म्हणून जगायचे असेल, तर बुद्धांच्या धम्माशिवाय पर्याय नाही. या जाणीवेतून समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित जीवन जगण्याचा मार्ग म्हणूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गौतम बुद्धाच्या धम्माचा स्वीकार केला, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुकुमार कांबळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित फुले–शाहू–आंबेडकर सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्मचिंतन या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

प्रा. सुकुमार कांबळे म्हणाले, प्राचीन काळातील वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था



कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना प्रा. सुकुमार कांबळे.

आणि विषमताधिष्ठित रचनेने समाजात माणसाला माणूस म्हणून मान्यता दिली नाही. हीच अन्यायकारक व्यवस्था पालटून टाकण्यासाठी बुद्धांनी 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय" हा मानवकल्याणाचा मार्ग दिला. सिद्धार्थ गौतम राजघराण्यात जन्माला आले असले तरी त्यांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवत सत्य आणि मानवकल्याणाचा शोध घेतला. निसर्गाच्या संसाधनासाठी माणसाने माणसाचा जीव घेऊ नये, हा त्यांचा विचार बुद्धधम्माच्या तत्त्वज्ञानात दिसून येतो. महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिरप्रवेश या चळवळींच्या माध्यमातून त्यांनी मूलभूत मानवी हक्कांसाठी लढा दिला. यावेळी आलेल्या विदारक अनुभवातून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवण्यासाठी नव्या मार्गाची गरज असल्याच्या निष्कर्षापर्यंत ते आले.

डॉ. विलास शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लोकाभिमुख व कर्तव्यदक्ष कार्यातूनच फुले, शाहू आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांच्या परंपरा विकसनाला बळ मिळाले आहे.

यावेळी अविनाश भाले यांनी स्वागत केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले.

1 5 APR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकर यांचे विचारकार्य आंतरराष्ट्रीय बौद्धिक चर्चा विश्वाच्या केंद्रस्थानी

## डॉ. प्रशांत बनसोडे : शिवाजी विद्यापीठात आकर्षक शोभायात्रेसह जयंती साजरी : लेझीम, हलगीची सादरीकरणे

जनप्रवास : कोल्हापूर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार केवळ भारतापुरते मर्यादित नसून जागतिक पातळीवर प्रभाव टाकणारे आहेत. आज जगभरात आंबेडकर जयंती साजरी होत असून,त्यांचे कार्य आणि विचार आंतरराष्ट्रीय बौद्धिक चर्चाविश्वाच्या केंद्रस्थानी आहे, असे प्रतिपादन पुणे येथील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. प्रशांत बनसोडे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठात मंगळवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आकर्षक शोभायात्रेसह लेझीम, हलगीची सादरीकरणे आणि व्याख्याने अशा विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. या निमित्त फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्य' यावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होत्या.

डॉ. बनसोडे यांनी डॉ. आंबेडकर यांचा जागतिक प्रभाव स्पष्ट करीत असताना लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि जर्मनीतील बॉन विद्यापीठ येथे आपणाला आलेल्या व्यक्तीगत अनुभवांच्या आधारे विवेचन केले. ते म्हणाले, आंबेडकरांच्या वैचारिक जडणघडणीमध्ये अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातील शिक्षणाचा मोठा प्रभाव राहिला. येथे त्यांचा लोकशाही,समानता,समाजवाद आणि सामाजिक न्याय यांसारख्या विचारधारांशी परिचय झाला. विशेषतः जॉन ड्युई यांच्या प्रागतिक विचारांचा प्रभाव आंबेडकरांच्या सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनात दिसून येतो. याशिवाय डॉ. आंबेडकरांनी कार्ल मार्क्स आणि भगवान बुद्ध यांच्या विचारांचे तुलनात्मक चिंतन करत स्वतःची स्वतंत्र विचारप्रणाली विकसित केली. सामाजिक क्रांती ही अहिंसक आणि लोकशाही मार्गाने घडवून आणण्याची त्यांची भूमिका 'डेमोक्रॅटिक सोशलिझम' या चौकटीतून समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेमध्ये सहभागी झालेल्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासमवेत महामानवांच्या वेशभूषेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि उपस्थित शिक्षक, अधिकारी.

### रिल मेकिंग स्पर्धेत प्रतिभा जाधव प्रथम

विद्यापीठाने फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत महामानवांवरील खुल्या रिल्स मेकिंग स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेला उदंड प्रतिसाद लाभला. आज त्याचे प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. या स्पर्धेचा निकाल अनुक्रमे असाः प्रतिभा जयसिंग जाधव (रु. ५००१/-, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), केदार सुरेश माने (रु. ३००१/-, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), प्रेरणा आर. खटावकर (रु. २००१/-, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), उत्तेजनार्थ- प्रकाश चांगदेव आवारे (प्रशस्तीपत्र) व कोमल चंद्रकांत गरड (प्रशस्तीपत्र).

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन**

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. सुहासिनी पाटील,डॉ. राजाराम गुरव, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार,डॉ. सावलीराम घाणे, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. सुनील गायकवाड, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. नितीन कांबळे, डॉ. नीलेश तरवाळ, उपस्थित होते.

15 APR 2026

सकाळ



शिवाजी विद्यापीठ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेमध्ये सहभागी झालेल्या महामानवांच्या वेशभूषेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींसमवेत प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, शिक्षक, अधिकारी.

# डॉ. आंबेडकरांचे विचार आंतरराष्ट्रीय बौद्धिक चर्चाविश्वाच्या केंद्रस्थानी

## डॉ. प्रशांत बनसोडे : विद्यापीठात शोभायात्रेसह जयंती

कोल्हापूर, ता. १४ : 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार केवळ भारतापुरते मर्यादित नसून जागतिक पातळीवर प्रभाव टाकणारे आहेत. आज जगभरात डॉ. आंबेडकर जयंती साजरी होत असून, त्यांचे कार्य, विचार आंतरराष्ट्रीय बौद्धिक चर्चाविश्वाच्या केंद्रस्थानी आहे', असे प्रतिपादन पुणे येथील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. प्रशांत बनसोडे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आकर्षक शोभायात्रा, व्याख्याने अशा विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी झाली. फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्य' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या. डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत केले. तेजपाल मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले. विद्यानंद खंडागळे यांनी आभार मानले.

दरम्यान, तत्पूर्वी, विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस डॉ. जाधव यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन केले. सुहासिनी पाटील, राजाराम गुरव, रामचंद्र पवार आदी उपस्थित होते. विद्यापीठाने घेतलेल्या महामानवांवरील खुल्या रिल्स मेकिंग स्पर्धेत प्रतिभा जाधव, केदार माने, प्रेरणा खटावकर, प्रकाश आवारे, कोमल गरड यांनी यश मिळविले.



डॉ. प्रशांत बनसोडे.

**भव्य शोभायात्रा...**

विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सकाळी विद्यापीठाच्या प्रांगणातून शोभायात्रा काढली. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, माता रमाई, अण्णा भाऊ साठे, लहुजी साळवे आदी महामानवांच्या वेशभूषेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी अग्रस्थानी होते. सजवलेल्या घोडाबग्गीमध्ये डॉ. आंबेडकर यांचे भव्य छायाचित्र ठेवले होते. लेझीम, हलगी, ढोल, झांजपथकाच्या निनादात आणि स्फूर्तीगीते गात विद्यार्थ्यांनी अभिवादन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 APR 2026

पुण्यनगरी


# डॉ. आंबेडकर यांचे विचारकार्य बौद्धिक चर्चाविश्वाच्या केंद्रस्थानी

## डॉ. प्रशांत बनसोडे; शिवाजी विद्यापीठात आकर्षक शोभायात्रेसह जयंती उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार केवळ भारतापुरते मर्यादित नसून ते जागतिक पातळीवर प्रभाव टाकणारे आहेत. आज जगभरात आंबेडकर जयंती साजरी होत असून, त्यांचे कार्य आणि विचार आंतरराष्ट्रीय बौद्धिक चर्चाविश्वाच्या केंद्रस्थानी आहे, असे प्रतिपादन पुणे येथील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. प्रशांत बनसोडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त



**शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना डॉ. प्रशांत बनसोडे.**

फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्य' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होत्या.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी डॉ. आंबेडकर यांनी सांगितलेला शिक्षणाचा खरा अर्थ आणि मानवाधिकार व समतेच्या विचारांची प्रस्तुतता विद्यार्थ्यांनी लक्षात घेणे आवश्यक असल्याचे नमूद केले. अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी आभार मानले.

तत्पूर्वी, विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पवार, सुरेखा अडके आदी उपस्थित होते.

**रिल मेकिंग स्पर्धेत प्रतिभा जाधव प्रथम :** विद्यापीठाने फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत महामानवांवरील खुल्या रिल्स मेकिंग स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते झाले. स्पर्धेचा निकाल अनुक्रमे असा, प्रतिभा जाधव, केदार माने, प्रेरणा खटावकर, उत्तेजनार्थ प्रकाश आवारे, कोमल गरड.

### विद्यार्थ्यांची शोभायात्रा

विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सकाळी विद्यापीठाच्या प्रांगणातून भव्य शोभायात्रा काढली. यामध्ये महामानवांच्या वेशभूषेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी अग्रस्थानी होते. सजवलेल्या घोडाबग्गीमध्ये डॉ. आंबेडकर यांचे भव्य छायाचित्र ठेवलेले होते. लेझीम, हलगी आणि ढोल, झांजपथकाच्या निनादात आणि स्फूर्तिगीते गात विद्यार्थ्यांनी महामानवाला अभिवादन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 APR 2026

तरुण भारत

**लक्षवेधी** डॉ. प्रशांत बनसोडे : विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

# डॉ. बाबासाहेबांचे विचार दिशादर्शक

**प्रतिनिधी**,कोल्हापूर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार केवळ देशापुरते मर्यादित नसून जागतिक पातळीवर प्रभाव टाकणारे आहेत. त्यांचे कार्य आणि विचार आंतरराष्ट्रीय बौद्धिक चर्चा विश्वाच्या केंद्रस्थानी आहेत, असे प्रतिपादन पुणे येथील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. प्रशांत बनसोडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात मंगळवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. फुले–शाहू–आंबेडकर सप्ताहांतर्गत आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्य या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होत्या. आकर्षक शोभायात्रा, लेझीम, हलगीच्या सादरीकरणहसह विविध उपक्रमांनी जयंती साजरी करण्यात आली.

डॉ. बनसोडे म्हणाले, डॉ. आंबेडकरांच्या जडणघडणीत अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातील




**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना डॉ. प्रशांत बनसोडे. सोबत प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे. डॉ. महादेव देशमुख.**

शिक्षणाचा मोठा प्रभाव राहिला. येथे त्यांचा लोकशाही, समानता, समाजवाद व सामाजिक न्याय यांसारख्या विचारधारांशी परिचय झाला. सामाजिक क्रांती ही अहिंसक व लोकशाही मार्गाने घडवून आणण्याची त्यांची भूमिका डेमोक्रॅटिक सोशलिझम या चौकटीतून समजून घेणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर डॉ. आंबेडकरांना 'सोशल जस्टिस क्रुसेडर" आणि 'ऑर्गॅनिक इंटेलेक्चुअल" म्हणून मान्यता मिळाली. याद्वारेच दलित व आफ्रो–अमेरिकन प्रश्नातील साम्य याबाबत डॉ. बाबासाहेबांना विवेचन करण्याची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकरांना केवळ प्रतीक म्हणून नव्हे, तर त्यांच्या विचारांची शास्त्रीय मांडणी समजून समाजपरिवर्तनासाठी उपयोग करावा, असे आवाहन डॉ. बनसोडे यांनी केले. कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेला शिक्षणाचा खरा अर्थ, मानवाधिकार व समतेच्या विचारांची प्रस्तुतता विद्यार्थ्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. केवळ परीक्षेपुरते न शिकता, मिळवलेल्या ज्ञानावर चिंतन करून ते समाजात वापरण्याचा व स्वत?ला एक परिपक्व माणूस म्हणून घडवणे आवश्यक आहे. महामानवांच्या जयंती उत्सवातून केवळ तात्पुरता उत्साह न दाखविता आपल्या आयुष्याला आकार द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत केले. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी आभार मानले.

## विद्यार्थ्यांची उत्साहपूर्ण शोभायात्रा

**विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी विद्यापीठाच्या प्रांगणातून भव्य अशी शोभायात्रा काढली. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता जिजाऊ साहेब, सावित्रीबाई फुले, माता रमाई, अण्णाभाऊ साठे, लहुजी साळवे आदी महामानवांच्या वेशभूषेतील विद्यार्थी–विद्यार्थिनी अग्रस्थानी होते. सजवलेल्या घोडाबग्गीमध्ये डॉ. आंबेडकर यांचे भव्य छायाचित्र ठेवलेले होते. लेझीम, हलगी आणि ढोल, झांजपथकाच्या निनादात आणि स्फूर्तीगीते गात विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले.**

15 APR 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय बौद्धिक विश्वात डॉ. आंबेडकरांचे विचार केंद्रस्थानी

- **डॉ. प्रशांत बनसोडे; शिवाजी विद्यापीठात १३५ व्या जयंतीनिमित्त शोभायात्रा**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार केवळ भारतापुरते मर्यादित नसून जागतिक बौद्धिक चर्चेच्या केंद्रस्थानी पोहोचले आहेत, असे प्रतिपादन डॉ. प्रशांत बनसोडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठ येथे आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.

फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत आयोजित 'आंबेडकर विचारांचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्य' या विषयावर बोलताना डॉ. बनसोडे म्हणाले, कोलंबिया विद्यापीठ येथे घेतलेल्या शिक्षणामुळे त्यांच्यावर लोकशाही, समता व सामाजिक न्याय या मूल्यांचा ठसा उमटला. तसेच जॉन ड्युई यांच्या प्रगत विचारांचा प्रभावही त्यांच्या भूमिकेत दिसून येतो. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी शिक्षणाचा सामाजिक उपयोग महत्त्वाचा असल्याचे सांगत 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश विद्यार्थ्यांनी आचरणात आणावा, असे आवाहन केले.

अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी प्रास्ताविक केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी सूत्रसंचालन, तर डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी आभार मानले. तत्पूर्वी, आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांची लेझीम, ढोल-ताशांच्या गजरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. दरम्यान, रिल मेकिंग स्पर्धेत प्रतिभा जाधव प्रथम, केदार माने द्वितीय व प्रेरणा खटावकर तृतीय ठरले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेमध्ये सहभागी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासमवेत महामानवांच्या वेशभूषेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि उपस्थित शिक्षक, अधिकारी.**